जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २४९ | बुधवार, ८ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210




# ऊर्जा, नियोजन आणि आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात मोठे बदल होणार : देवेंद्र फडणवीस

## महावितरणची आर्थिक पुनर्रचना सुरू, मंत्रिमंडळात अनेक निर्णयांना मंजुरी

**अश्लेषा मस्के**

पुणे, ता. ७ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल (ता. ७ एप्रिल) राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत प्रशासन अधिक वेगवान आणि सक्षम करण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ऊर्जा, नियोजन आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये मोठे बदल करण्याचा सरकारचा प्रयत्न या निर्णयांतून दिसून येतो.

या बैठकीतील सर्वात मोठा निर्णय म्हणजे महावितरण कंपनीची आर्थिक पुनर्रचना. सध्या महावितरणवर मोठ्या प्रमाणात कर्जाचा बोजा आहे. हे लक्षात घेऊन राज्य सरकारने या कंपनीसाठी नवा मार्ग स्वीकारला आहे. शासन हमी असलेल्या सुमारे ३२६७९ कोटी रुपयांच्या कर्जासाठी भांडवली बाजारात सरकारी रोखे आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे



महावितरणला आर्थिक दिलासा मिळणार असून, कँमनी भविष्यात भांडवली बाजारात सूचीबद्ध होणार आहे. याशिवाय कृषी वीज वितरण व्यवसाय वेगळा करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे कंपनीचे कामकाज अधिक स्पष्ट आणि सुटसुटीत होण्याची अपेक्षा आहे.

नियोजन विभागाशी संबंधितही दोन मोठे निर्णय घेण्यात आले. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर याची रचना बदलून आता त्याला कंपनीचा दर्जा दिला जाणार आहे. यापूर्वी ही संस्था सोसायटी अधिनियम १८६० अंतर्गत कार्यरत होती. आता कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ८ अंतर्गत ती नव्याने स्थापन होईल. या बदलामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार, पाणलोट विकास, डोंगरी विकास योजना, ई-पंचनामा, शेती तंत्रज्ञान, कांदळवन अभ्यास, भूजल व्यवस्थापन आणि खाणींचा अभ्यास अशा विविध प्रकल्पांना गती मिळणार आहे.

याचबरोबर राज्यात भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर करण्यासाठी महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) ही नवीन कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि नवोप्रक्रमांना चालना दिली जाणार आहे. विद्यार्थी, संशोधक आणि व्यावसायिकांसाठी विविध शैक्षणिक कार्यक्रमही राबवले जाणार आहेत.

आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातही सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत खाजगी गुंतवणुकीच्या मदतीने निधी उभारला जाणार आहे. तसेच जागतिक बँकेकडून सुमारे १६५ कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. या योजनेमुळे आपत्तीग्रस्त नागरिकांना गृहकर्जात सवलत, तसेच लघु आणि मध्यम उद्योगांना कर्ज आणि विमा संरक्षण मिळणार आहे. पूरस्थिती लक्षात घेऊनही सरकारने ठोस पावले उचलली आहेत. कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी आणि कृष्णा खोऱ्यातील भागांमध्ये पूराचा धोका कमी करण्यासाठी विशेष आराखडे तयार करण्यात येणार आहेत. पावसाळ्यात वारंवार निर्माण होणाऱ्या पूरस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी हे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

एकूणच, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेले निर्णय राज्याच्या विकासाला गती देणारे आणि प्रशासन अधिक सक्षम बनवणारे असल्याचे चित्र दिसत आहे. आर्थिक सुधारणा, तंत्रज्ञानाचा वापर आणि आपत्ती व्यवस्थापन या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर सरकारने विशेष भर दिला आहे. आगामी काळात या निर्णयांची अंमलबजावणी कशी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## करमाळ्यात परवानगीशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला

**करमाळा, ता. ७ :** पुनवर (ता. करमाळा) येथे पहाटेच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पुतळा परवानगीशिवाय बसवण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी ११ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रशासनात खळबळ उडाली आहे.

१) सुरज कैलास शेळके, २) किरण भिमराव नरसाळे, ३) अशोक सुभाष नरसाळे, ४) राजेश नानासाहेब ननवरे, ५) भाऊ अर्जुन नरसाळे, ६) मयुर मच्छिंद्र सावंत, ७) अविनाश कांतीलाल शेलार, ८) ऋषीकेश बाळु नरसाळे, ९) शांतिलाल प्रकाश शेळके, १०) बळीराम हनुमंत नरसाळे (सर्व रा. पुनवर ता. करमाळा) तसेच ११) बाळराजे आवारे पाटील (रा. महाकाळा ता. अंबड जि. जालना) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत ग्रामविकास अधिकारी प्रदीप मधुकर मोकाशी (वय ४४) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोकाशी हे २०२३ पासून पुनवर ग्रामपंचायतीत कार्यरत आहेत. १० मार्च २०२६ रोजी पहाटे ५ वाजण्यापूर्वी पुनवर गावातील दत्त मंदिरासमोर असलेल्या खाजगी जागेत छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पुतळा उभारण्यात आला. ही बाब मंडळ अधिकारी पांडेकर यांनी मोकाशी यांना फोनद्वारे कळवली. त्यानंतर त्यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता पुतळा बसवलेला असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकाराची माहिती तत्काळ पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यानंतर गट विकास अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले. तपासात असे निष्पन्न झाले की, संबंधित ११ जणांनी संगनमत करून कोणतीही शासकीय परवानगी न घेता बेकायदेशीर जमाव जमवून हा पुतळा बसवला.

## दौंडमध्ये रात्रीचे भारनियमन बंद करा; राष्ट्रवादी पवार गटाचा महावितरणवर ‘एल्गार’

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ७ : दौंड तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून महावितरण विभागाच्या वतीने संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत सर्रासपणे भारनियमन केले जात आहे. या अन्यायकारक निर्णयामुळे सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि शेतकरी त्रस्त झाले असून, याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने दौंड तालुकाध्यक्ष रामभाऊ टुले यांच्या नेतृत्वात महावितरणच्या दापोडी कार्यालयावर जोरदार आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान कार्यकारी अभियंता आल्हाट यांना देण्यात आलेल्या निवेदनात भारनियमनामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा पाढा वाचण्यात आला. सध्या वार्षिक



परीक्षांचा काळ असून, संध्याकाळी वीज नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मोठा व्यत्यय येत आहे. अंधारामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप पक्षाने केला आहे. उन्हाळ्याचा कडाका आणि अवकाळी पावसामुळे वाढलेली आर्द्रता यामुळे नागरिक हैराण आहेत. वीज नसल्याने ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे प्रचंड हाल होत आहेत. सध्या लग्नसंराई आणि गावजत्रांचे दिवस आहेत. रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन चोरीसारख्या गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता निवेदनात वर्तवण्यात आली आहे. तालुकाध्यक्ष रामभाऊ टुले यांनी स्पष्ट केले की, महावितरणचा हा निर्णय अत्यंत अन्यायकारक असून जनतेची मोठी गैरसोय होत आहे. जर भारनियमन तात्काळ बंद झाले नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने संपूर्ण तालुक्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल. या इशाऱ्यानंतर महावितरणच्या वतीने वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

दरम्यान, या आंदोलनात प्रदेश सरचिटणीस अजित शितोळे, चैतन्य पाटोळे, तालुका युवक अध्यक्ष अमित दोरगे, ज्ञानेश्वर गुलाबराव लकडे, विजय शेंडगे, सचिन शिंदे, राजेंद्र पांढरे, महेश ताकवणे, विजयराव चव्हाण, सर्जेराव टुले, उत्तम जराड यांसह पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांना सुनावणीतून बाजूला ठेवावे; अरविंद केजरीवाल यांची मागणी

**नवी दिल्ली, ता. ७ :** दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली उच्च न्यायालयात स्वतः हजर राहून न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी या प्रकरणाच्या सुनावणीतून बाजूला व्हावे, अशी मागणी केली. मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणात केजरीवाल आणि इतर सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला सीबीआयने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

याच याचिकेवर न्यायमूर्ती शर्मा यांच्यासमोर सुनावणी सुरू असून, केजरीवाल यांनी त्यांच्या तटस्थतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. न्यायालयाने ही विनंती रेकॉर्डवर घेतली असून, पुढील सुनावणी एप्रिल रोजी निश्चित केली आहे. अरविंद केजरीवाल यांनी न्यायालयात स्पष्ट केले की, ते या अर्जावर स्वतः युक्तिवाद



करतील. ई-फायलिंग प्रक्रियेतील तांत्रिक अडचणींमुळे त्यांनी आपला अर्ज प्रत्यक्षरीत्या स्वीकारण्याची विनंती न्यायालयाला केली. केजरीवाल यांच्या वतीने सांगण्यात आले की, या प्रकरणाची सुनावणी दुसऱ्या खंडपीठाकडे हस्तांतरित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका आता मागे घेण्यात आली आहे, त्यामुळे आता उच्च न्यायालयानेच या अर्जावर निर्णय घ्यावा. सीबीआयच्या वतीने बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केजरीवाल यांच्या या कृतीला नाट्यमय म्हणटले. न्यायालय हे अशा प्रकारच्या नाट्यच्या प्रदर्शनासाठीचे व्यासपीठ नाही, असे सांगत त्यांनी केजरीवाल यांच्या आरोपांना फालतू आणि अवमानकारकम्हटले. काही लोक संस्थांविरुद्ध बिनबुडाचे आरोप करून आपली कारकीर्द घडवत आहेत, अशी टीका करत मेहता यांनी न्यायालयाच्या प्रतिष्ठेचे समर्थन करण्याची गरज व्यक्त केली. एकूण सात आरोपींनी अशाच प्रकारचे अर्ज दाखल करणे हा एका नियोजित कटाचा भाग असल्याचेही त्यांनी नमूद केले. विशेष न्यायालयाने पुराव्यांच्या अभावी केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि इतर २१ जणांची निर्दोष मुक्तता केली होती. सीबीआयचा खटला न्यायालयीन छाननीत टिकणारा नाही, असे ताशेरे कनिष्ठ न्यायालयाने ओढले होते. मात्र, ९ मार्च रोजी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी या निकालाला स्थगिती देताना प्राथमिक दृष्ट्या कनिष्ठ न्यायालयाचे निष्कर्ष चुकीचे असल्याचे निरीक्षण नोंदवले होते. तेव्हापासूनच या खटल्याच्या निष्पक्षपातीपणाबद्दल केजरीवाल आणि इतर आरोपींनी शंका उपस्थित करत न्यायमूर्ती बदलण्याची मागणी लावून धरली आहे.


## पार्थ चुकलास, कुठलाही पक्ष संपत नसतो, जमिनीवर राहणं महत्त्वाचं

### रोहित पवारांचा सबुरीचा सल्ला

**बारामती, ता. ७ :** बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित खासदार पार्थ पवार यांनी काँग्रेसबाबत केलेल्या वक्तव्याचे पडसाद अजूनही राजकीय वर्तुळात उमटताना दिसत आहेत. त्यांच्या वक्तव्यानंतर आता शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्यानंतर रोहित पवार यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

रोहित पवार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, तुम्ही सत्तेत असाल किंवा विरोधात, जमिनीवर राहणं महत्त्वाचं असतं. त्यांनी पार्थ पवार यांच्या विधानावर सबुरीचा सल्ला देत म्हटले की, कोणताही पक्ष संपत नसतो आणि प्रत्येक पक्ष आपापल्या पातळीवर काम करत असतो. त्यामुळे दुसऱ्या पक्षाबद्दल बोलताना तो संपला असे म्हणणे योग्य नाही.

ते पुढे म्हणाले की, पार्थ पवार





यांचे वक्तव्य घाईगडबडीत झालेले वाटते. आता त्यांना विचारलं तर कदाचित ते म्हणतील की, माझ्या विधानाचा वेगळा अर्थ काढला गेला. मात्र, ते विधान योग्य नव्हते, अशा शब्दांत रोहित पवारांनी पार्थ पवारांचे कान टोचले. तसेच या वादावर तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त करत रोहित पवार म्हणाले की, वरिष्ठ नेते, कुटुंबातील सदस्य काँग्रेसशी संवाद साधून काही मार्ग काढतील, अशी अपेक्षा आहे.

## काँग्रेसकडून पार्थ पवारांवर टीका; राष्ट्रवादीकडून राहुल गांधीचे नाव घेत बोचरा पलटवार

**पुणे, ता. ७ :** पार्थ पवार यांच्या काँग्रेसविषयीच्या एका वक्तव्यामुळे राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेसच्या महाराष्ट्रातील डाऊनफॉलची सुरूवात असल्याची टिप्पणी पार्थ पवार यांनी केली होती. यावरुन काँग्रेसमधून तीव्र प्रतिक्रिया समोर येत आहेत. अशातच काँग्रेसच्या टीकेला राष्ट्रवादीकडून पहिला पलटवार करण्यात आला आहे.

पार्थ पवार यांच्या काँग्रेस पक्षाच्या वक्तव्याला महाराष्ट्र काँग्रेसने सोशल मीडिया एक्सवरुन नाव न घेता ट्विट करुन प्रत्युत्तर दिले होते. त्यानंतर काँग्रेसच्या नाना पटोले यांनी



देखील प्रतिक्रिया दिली. ते वेळ सांगेल, कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल, असे पटोले म्हणाले. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे महाराष्ट्र सरचिटणीस सुरज चव्हाण यांनी काँग्रेससह राहुल गांधींवरती जोरदार टीका केली आहे.

आमच्या नेत्यावर टीका करण्यापेक्षा राहुल गांधी यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत काय केलं ते आधी काँग्रेसने पहावं. महाराष्ट्राची परंपरा आहे, निधनानंतर त्याच घरातील व्यक्ती पोटनिवडणुकीत लढत असेल तर बिनविरोध करणे. मात्र काँग्रेसने ती परंपरा पाळली नाही, राजकीय परंपरेला छेद देण्याचा काम काँग्रेसने केलेले आहे, अशा शब्दांत सूरज चव्हाण यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न सुरू होते. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने उमेदवार देणार नसल्याचे जाहीर केले. मात्र, काँग्रेस पक्षाने बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार जाहीर केला. सुनेत्रा पवार यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी फोनद्वारे संवाद साधत पाठिंबा देण्याची मागणी केली होती.

पार्थ पवार यांनी यावर भाष्य करताना काँग्रेसविषयी वक्तव्य केले. ते म्हणाले. लोक विसरत नाहीत. जे दादांचं प्रेम आहे लोकांच्या मनात, अशावेळी एवढ्या मॅच्युअर पार्टीने हा निर्णय घेणे, जिथे एवढे मोठे नेते आहेत, अतिशय चुकीचं आहे. मला वाटतं की आपण कोणाला थांबवू शकत नाही. जशी वेळ येते तसं सामोरं जावं लागतं. आम्ही सामोरं जाऊ, आम्ही काही कुणाला फोन करणार नाही, जे काही नशिबात लिहिलं आहे, ते बघू काय व्हायचंय ते. फक्त मला वाईट वाटतंय की काँग्रेसचा महाराष्ट्रात डाऊनफॉल आहे, असे वक्तव्य पार्थ पवार यांनी केले होते.

## संक्षिप्त

### पिंपरीत चार कोटींचे कर्ज मिळवून देण्याच्या बहाण्याने साडेपाच लाखांची फसवणूक

**पिंपरी, ता. ७ :** बांधकाम व्यवसायासाठी चार कोटी रुपयांचे कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यावसायिकाची पाच लाख ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. ही घटना ५ जानेवारी ते २७ जानेवारी दरम्यान हिंजवडी चौक येथे घडली. या प्रकरणी ३५ वर्षीय व्यावसायिकाने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांना चार कोटींचे कर्ज मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी बाणेर येथील एका सदनिकेचा समझोता करारनामा केला. त्याची मूळ प्रत आणि आगाऊ सुरक्षा ठेव म्हणून पाच लाख ५० हजार रुपये घेतले. मात्र, कर्ज न मिळवून देता ही रक्कम परत न करता फसवणूक केली. हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.

### कुरुळीत देहविक्री व्यवसायावर पोलिसांचा छापा

**चाकण, ता. ७ :** खेड तालुक्यातील कुरुळी गावच्या हद्दीत सार्वजनिक ठिकाणी देहविक्री व्यवसायासाठी ग्राहकांना आकर्षित करणाऱ्या तीन महिलांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात पोलीस शिपाई भाऊसाहेब पवार यांनी दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी तीन महिला आरोपींना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम ३५ (३) नुसार नोटीस बजावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी महिला आरोपींनी देहविक्री व्यवसायाच्या उद्देशाने लैंगिक हावभाव करून सार्वजनिक शिष्टाचाराचा आणि सभ्यतेचा भंग केला. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारचे कृत्य केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करत आहेत.

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू; चालकाला अटक

**पिंपरी, ता. ७ :** चिंचवड येथील बर्ड व्हॅली गार्डनसमोर भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत एका ४२ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. ही घटना सोमवारी (ता. ३) सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास घडली. सुभाष बन्सी ओव्हाळ (४२) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या अपघाताप्रकरणी अजय सुभाष ओव्हाळ (२३, साने चौक, चिखली) यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी टेम्पो ट्रक चालक संतोष सुभाष दळगडे (४५, टॉवर लाईन, चिखली; मूळ रा. धाराशिव) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीचे वडील सुभाष ओव्हाळ हे त्यांच्या दुचाकीवरून थरमॅक्स चौकाकडून बर्ड व्हॅलीकडे जात होते. त्यावेळी आरोपी चालकाने टेम्पो वेगाने आणि निष्काळजीपणे पाठीमागे घेऊन दुचाकीला जोरात धडक दिली. ट्रक अंगावरून गेल्याने गंभीर दुखापत होऊन सुभाष ओव्हाळ यांचा मृत्यू झाला. निगडी पोलीस तपास करत आहेत.

### मोटारीची दुचाकीला धडक; एक जण जखमी

**पिंपरी, ता. ७ :** एका भरधाव मोटारीने दुचाकीला पाठीमागून जोरात धडक दिली. यामध्ये दुचाकीस्वार तरुण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना ३ फेब्रुवारी रोजी देहूरोड ते तळवडे दरम्यान घडली. याप्रकरणी २७ वर्षीय तरुणाने सहा एप्रिल रोजी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मोटार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी त्यांच्या दुचाकीवरून जात असताना आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार अतिशय वेगाने आणि बेदरकारपणे चालवून धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या उजव्या पायाला आणि घोट्याला गंभीर दुखापत झाली. वाहनाचेही मोठे नुकसान झाले आहे. देहूरोड पोलीस तपास करत आहेत.

### वडमुखवाडी येथे महिलेवर कारवाई

**पिंपरी, ता. ७ :** दिघी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वडमुखवाडी येथील सार्वजनिक रस्त्यावर देहविक्री व्यवसायासाठी अश्लील हावभाव करणाऱ्या एका महिलेवर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस शिपाई सोमनाथ खळसुडे यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संबंधित महिला आरोपीला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ नुसार नोटीस देण्यात आली आहे. महिला आरोपी देहविक्री व्यवसायाच्या उद्देशाने अश्लील अंगविक्षेप करून आणि शब्दांचा वापर करून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना अडथळा निर्माण करत होती. या कृत्यामुळे सार्वजनिक सभ्यता आणि शिष्टाचाराचा भंग झाल्याने तिच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दिघी पोलीस तपास करत आहेत.

### चिंबळी फाटा येथे जुगारावर कारवाई

**पिंपरी, ता. ७ :** नाशिक-पुणे हायवे लगत जुगार चालवणाऱ्या दोन तरुणांवर पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी पोलीस शिपाई शिवाजी मरकड यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस पेट्रोलिंग दरम्यान आरोपी हे लोकांकडून पैसे घेऊन जुगार खेळवत असल्याचे दिसून आले. घटनास्थळावरून जुगाराचे साहित्य आणि रोकड जप्त करण्यात आली आहे. दक्षिण म्हाळुंगे पोलीस तपास करत आहेत.

# लोणी काळभोरमध्ये रॅपिडो चालकावर हल्ला; भाड्याच्या वादातून दगडांनी मारहाण

## जखमीवर आयसीयूमध्ये उपचार सुरु

**लोणी काळभोर, ता. ७ :** भाड्याच्या किरकोळ वादातून संतप्त प्रवाशांनी थेट चालकावर दगडांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात रॅपिडो चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या आयसीयूमध्ये उपचार सुरु आहेत. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील साईसृष्टी अपार्टमेंट परिसरात रविवारी (ता. ५) रात्री साडेनऊच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

श्रीकृष्ण मधुकर लाड (वय ३०) असे जखमी चालकाचे नाव आहे. तर धवल मोहन रावले, सरस्वती धवल रावले, वैष्णवी सरस्वती रावले यांच्या आत्याची मुलगी, यशवंत मल्लेश चळवादी, यशवंत चळवादी यांची



बहीण सुषमा चळवादी व मनिषा चळवादी असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीकृष्ण लाड हे लोणी काळभोर येथे कुटुंबासह वास्तव्यास आहेत. ते स्वतःच्या कारद्वारे रॅपिडो ॲपवर प्रवासी वाहतूक करून उदरनिर्वाह करतात. श्रीकृष्ण लाड यांना साईसृष्टी अपार्टमेंट परिसरातून बुकिंग मिळाली. ते ठिकाणी पोहोचल्यावर एक इसम पुढील सीटवर आणि चार महिला मागील सीटवर बसल्या. चार प्रवासी बसविण्यास नियमांनुसार मनाई असल्याचे सांगितल्यावर व प्रति किलोमीटर २५ रुपये दर सांगितल्यावर प्रवाशांनी आक्रमक भूमिका घेत वाद घातला.

वाद वाढताच संबंधितांनी बुकिंग रद्द केले. मात्र काही वेळातच तेच लोक पुन्हा चालकाजवळ येत तुला खूप मस्ती आली का? अशा शब्दांत शिवीगाळ करत थेट हल्ला चढवला. आरोपींनी चालकाला गाडीतून ओढून बाहेर काढत मारहाण सुरू केली. त्यानंतर महिलांनीही दगड उचलून डोक्यावर, कानावर, पोटावर आणि पाठीवर जबर प्रहार केले. या भीषण मारहाणीत श्रीकृष्ण लाड यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी धाव घेत त्यांना हल्लेखोरांच्या तावडीतून सोडवले. त्यांना प्रथम लोणी काळभोर येथील प्राथमिक रुग्णालयात व नंतर जगदंबा हॉस्पिटल, कदमवाकवस्ती येथे आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी मेंदूला जबर मार लागल्याचे सांगितले आहे. हल्लेखोरांनी केवळ मारहाणच केली नाही, तर कारची चावी काढून दगडाने तोडफोड देखील केली. घटनेचा व्हिडिओ समोर आल्यानंतर आरोपींची ओळख पटली आहे.

याप्रकरणी श्रीकृष्ण लाड यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अंकुश बोराटे करत आहेत.

### पुण्यात महिलेवर बलात्कार

**पुणे, ता. ७ :** विवाहविषयक संकेतस्थळावरुन झालेल्या ओळखीतून महिलेवर बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी हडपसर पोलिसांकडून एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४२ वर्षीय आरोपी मुंढव्यातील कीर्तनेबाग परिसरात राहायला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४२ वर्षीय पीडित महिलेची आरोपीशी तीन वर्षांपूर्वी एका विवाहविषयक संकेतस्थळावरुन ओळख झाली होती. त्यानंतर आरोपीने महिलेशी संपर्क साधला आणि विवाह करण्याबाबत उत्सुक असल्याचे सांगितले. विवाहाचे आमिष दाखवून त्याने महिलेला जाळ्यात ओढले. त्याने महिलेवर बलात्कार केला. महिलेने त्याच्याकडे विवाहाबाबत विचारणा केली. तेव्हा त्याने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. त्याने विवाहास नकार दिला. त्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली.

# पुणे–सोलापूर महामार्गावर बलेनो कारसह २० लाखांचा गांजा जप्त; दोघांना अटक

**यवत, ता. ७ :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर धायगुडेवाडी (ता. दौंड) गावच्या हद्दीत एका चारचाकी वाहनासह तब्बल २० लाख ३० हजार रुपयांचा गांजा यवत पोलिसांनी जप्त केला आहे. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. हि कारवाई हॉटेल दुर्गा समोर मंगळवारी (ता. ३१) रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

शाकीर शब्बीर पानसरे (मूळ रा. तालमीसमोर, येवलेवाडी, ता. हवेली; सध्या रा. अहिल्यादेवी चौक, चोरमले बिल्डींग, सुपे, ता. बारामती), व समाधान शिवाजी दाभाडे (रा. अंतुलेनगर, येवलेवाडी, ता. हवेली, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे



आहेत. याप्रकरणी यवत पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार गुरुनाथ युवराज गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यवत पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार गुरुनाथ गायकवाड यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, सोलापूर-पुणे महामार्गावरून एका पांढऱ्या रंगाच्या कारमधून मोठ्या प्रमाणात गांजाची वाहतूक केली जाणार आहे. या माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलीस पथकाने मंगळवारी रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास धायगुडेवाडी येथील हॉटेल दुर्गा समोर सापळा रचला. संशयास्पद मारुती सुझुकी बलेनो कारची झडती घेतली असता, पोलिसांना खाकी रंगाच्या चिकटपट्टीने (सेलो टेप) बंद केलेली सहा वेगवेगळी पाकिटे मिळून आली. या पाकिटांची तपासणी केली असता त्यात अमली पदार्थ असलेला गांजा आढळला. यावेळी त्याचे वजन केले असता सदरचा गांजा हा २९ किलो ७०० ग्रॅम असल्याचे दिसून आले. यावेळी पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली ५ लाख ५० हजार रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी बलेनो कार व गांजा असा २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी वरील दोन्ही आरोपींविरुद्ध यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस सहायक पोलीस निरीक्षक महेश माने करीत आहेत.

### मुंढवा ब्रिजवर दुचाकीस्वारांचा उलट दिशेने सुसाट

**पुणे, ता. ७ :** हडपसरखराडी रोडवरील मुंढवा ब्रिज परिसरात वाहतूक नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. जीवाची पर्वा न करता अनेक दुचाकीस्वार थेट विरुद्ध दिशेने गाड्या चालवत असल्याने अपघाताचा धोका प्रचंड वाढला आहे.

दररोजच्या गर्दीच्या वेळी वेळ वाचवण्यासाठी काही बेफिकीर चालक वन-वे नियम धाब्यावर बसवून सर्रास उलट दिशेने धावताना दिसत आहेत. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनचालकांना अचानक समोर बाईक आल्याने अपघात टाळणे कठीण होत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, मुंढवा ब्रिज हा आधीच वाहतुकीच्या दृष्टीने संवेदनशील पॉईंट असून, अशा बेकायदेशीर हालचालींमुळे परिस्थिती आणखी गंभीर होत आहे. अनेक वेळा थोडक्यात अपघात टळल्याच्या घटना




घडत असून, मोठी दुर्घटना होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी संताप व्यक्त करत वाहतूक पोलिसांनी येथे तातडीने कडक कारवाई करावी, सीसीटीव्हीद्वारे दंडात्मक कारवाई वाढवावी, अशी मागणी केली आहे. नियम तोडणाऱ्या अशा स्टंटबाज चालकांवर आळा बसला नाही, तर भविष्यात मोठा अनर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जीव धोक्यात घालणाऱ्यांवर लगाम कधी बसणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# पतसंस्थेच्या बनावट खात्यांमधून ६० कोटींचा व्यवहार; खरातचा नवा कारनामा

**नाशिक, ता. ७ :** भोंदू अशोक खरातच्या काळ्या कारनाम्याची व्याप्ती दिवसागणिक वाढत आहे. पोलीस तपासात दररोज नवी माहिती समोर येत आहे. कोपरगावच्या समता पतसंस्थेतील बनावट खात्यांमधून ६० कोटींचा व्यवहार के२ल्याचे उघडकीस आले आहे. कोट्यवधीचे व्यवहार झालेला खातेधारक नामकर्ण आवारे याची शिर्डी पोलिसांनी चौकशी केली. या चौकशीत त्याने 'ती' खाती आपली नसल्याचा दावा करतानाच, खाते उघडण्यासाठी कधी गेलोच नाही, असा धक्कादायक जबाब पोलिसांना दिला.

शिर्डीतील जमीन व्यवहार प्रकरणात सिन्नरची जगदंबा आणि कोपरगावच्या समता पतसंस्थेची राहाता शाखा चर्चेत आली आहे. दोन्ही संस्थांमध्ये १३२ वेगवेगळ्या नावांनी बनावट खाती उघडण्यात आली.



त्या सर्व खात्यांचा वारसदार अशोक खरातच आहे. याशिवाय त्याचाच मोबाईल नंबर या खात्यांना लिंक आहे. समता पतसंस्थेतून तब्बल ६० कोटींचे व्यवहार करण्यात आल्याचे पोलीस तपासात समोर आल्यानंतर हे व्यवहार पोलिसांच्या रडारवर आले आहेत.

पोलिसांनी प्राथमिक तपासात खातेधारकांचे जबाब घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. स्वलिखित पुस्तकात भोंदू खरातची भलामण करणारा नामकर्ण आवारे याची शिर्डी पोलिसांनी चौकशी केली. त्याची सहा खाती समता पतसंस्थेत आहेत. आवारे स्वतः जगदंबा पतसंस्थेचे चेअरमन आहेत.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी आवारेंची दोन तास चौकशी केली. या चौकशीत आवारे यांनी सांगितले, की समतामध्ये असलेली सहा खाती आणि स्वाक्षरीही माझी नाही. त्यावरील १ कोटी २० लाखांचे व्यवहारही मी केलेले नाहीत. मी कधीही संस्थेत खाते उघडण्यासाठी गेलो नाही, असा जबाब दिल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. याशिवाय अन्य काही खातेधारकांनीही पोलिसांशी संपर्क साधत ते खाते आमचे नाही, असे सांगितल्याची माहिती पुढे येत आहे. ज्यांच्या नावे खाते आहे, ते खातेधारकच आता इन्कार करू लागल्याने गूढ वाढत चालले आहे.

# अनेक कायदे करूनही महिलांच्या जीवनावर पुरुषप्रधान संस्कृतीचे नियंत्रण कसे?

## सुप्रीम कोर्टाने व्यक्त केली खंत

**नवी दिल्ली, ता. ७ :** स्त्री-पुरुष समानतेसाठी अनेक कायदे झाले, ऐतिहासिक निकालही आले, तरीही समाजात पुरुषप्रधान संस्कृतीचे मूळ आजही खोलवर रुजलेले आहे. अनेक कायदे करूनही महिलांच्या जीवनावर पुरुषप्रधान संस्कृतीचे नियंत्रण कसे? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठाने राजस्थानमधील एका प्रकरणावर निकाल देताना ही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली.

राजस्थानमधील २०११ मध्ये एका व्यक्तीने आपल्या पत्नीला जिवंत जाळले होते. आरोपीची जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवताना न्यायालयाने हिंदुस्थानातील विदारक सामाजिक वास्तवावर भाष्य केले आहे. महिलांवर होणाऱ्या विविध अत्याचारांविरोधात



कायदे आले, पण समाजाची मानसिकता बदललेली नाही. महिलांवरील अत्याचाराच्या घटना अद्याप थांबलेल्या नाहीत. २०२३ मध्ये महिलांवरील अत्याचाराबाबत ४.४८ लाखांहून अधिक गुन्हे नोंदवले गेले. घर हे महिलांसाठी सर्वात सुरक्षित जागा मानली जाते, मात्र महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सर्वाधिक कौटुंबिक अत्याचाराच्या घटनांचा समावेश आहे, ही चिंतेची बाब आहे. दरवर्षी ६ हजाराहून अधिक हुंडाबळीच्या घटना घडतात, देशासाठी हे अत्यंत लाजिरवाणे आहे. यावरून महिलांची असुरक्षितता अधोरेखित होते, असे न्यायालयाने नमूद केले.

आजही घरातील सर्व अधिकार पुरुषांकडे आहेत. महिलांचे स्वातंत्र्य अनेकदा अटींच्या अधीन असते. नोकरी करणाऱ्या महिलांनाही दुहेरी जबाबदारी सांभाळावी लागते. कौटुंबिक हिंसाचार किंवा पत्नीला जाळण्यासारख्या घटना केवळ अपवाद नाही, ही एक सामाजिक विकृती आहे. समाजाला जडलेल्या रोगाचे लक्षण असल्याचे न्यायालय म्हणत जोपर्यंत समाजाचा दृष्टिकोन बदलत नाही, तोपर्यंत घटनात्मक अधिकार केवळ कागदावरच राहतील, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# दुसऱ्या लग्नात अडथळा ठरणाऱ्या ११ महिन्यांच्या मुलाची हत्या

**पुणे, ता. ७ :** पुण्यातील रांजणगावमध्ये मातृत्वाला काळिमा फासणारी घटना घडली आहे. नेहमी किरकिर करायचा आणि दुसऱ्या लग्नात अडथळा ठरत असल्याने आईने पोटच्या ११ महिन्यांच्या मुलाची हत्या केली. मुलाची हत्या केल्यानंतर मृतदेह बॅगेत भरून विहिरीत फेकला. याप्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपी मातेला अटक केली आहे. पूजा रविंद्र पवार असे आरोपी महिलेचे नाव आहे.

भांबार्डे येथील रविंद्र अशोक पवार यांनी ८ मार्च २०२६ रोजी आपली पत्नी पूजा ११ महिन्यांच्या मुलासह घर सोडून गेल्याची तक्रार पोलिसात दाखल केली होती. यानंतर टाकळी हाजी पोलिसांना ५ एप्रिल २०२६ रोजी पूजा जांबूत गावच्या हद्दीत सापडली. सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी पूजाची चौकशी केली असता




मुलाचा ओट्यावरून पडून मृत्यू झाला. यानंतर आपण घाबरून मुलाचा मृतदेह बॅगेत भरून विहिरीत फेकल्याचे तिने पोलिसांना सांगितले. पूजाच्या जबाबनुसार रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. पूजाने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी विहिरीतून मुलाचा मृतदेह बाहेर काढला. घटनेचे पुरावे गोळा करत मृतदेह सडल्याने तेथेच अंत्यविधी करण्यात आले. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी पूजाला विश्वासात घेत चौकशी केली असता तिने गुन्ह्याची कबुली दिली. मुलगा नेहमी किरकिर करायचा. तसेच मुलामुळे दुसरा विवाह होण्यास अडचणी येत होता, त्यामुळे घरासमोरील कपडे धुण्याच्या सिमेंटच्या ओट्यावर डोकंआपटून त्याची हत्या केली. गुन्हा लपवण्यासाठी मृतदेह बॅगेत भरला. त्यानंतर मृतदेह पाण्यात बुडून रहावा म्हणून त्यात दोन दगड भरले आणि बॅग शेतातील विहिरीत फेकून दिली. आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# सशक्त लोकशाहीत प्रत्येकाला निवडणूक लढण्याचा अधिकार ; सुप्रिया सुळेंनी पार्थ पवारांचे कान टोचले

**बारामती, ता. ७ :** बारामती पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेसने उमेदवार देणे गैर नाही. सशक्त लोकशाही आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आखून दिलेल्या संविधानाच्या चौकटीत काम करायचे झाले तर प्रत्येकाला निवडणूक लढण्याच अधिकार आहे, असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. तसेच अजित पवार गटाचे राज्यसभा खासदार आणि भाचा पार्थ पवार यांचेही काँग्रेस पक्षावर केलेल्या विधानावरून कान टोचले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, माझा मोठा भाऊ अजितदादा गेल्यानंतरही ही निवडणूक आहे.



आम्ही कर्ता पुरूष गमावला. अजूनही आम्ही त्या दुःखातून बाहेर पडलेलो नाही. सगळे कामाला लागले आहेत, पण दादा नाही याचे दुःख आयुष्यभर राहील. आम्ही बारामतीला उमेदवार देणार नाही हे आधीच स्पष्ट केले होते. बाकीच्यांनी काय करायचे हे सशक्त लोकशाहीत वैयक्तिक आणि त्यांच्या पक्षाचा विषय असतो.

राज्यसभा निवडणुकीवेळी आम्ही सर्वच पक्षांनी चर्चा केली होती. एकमेकांवर विश्वास ठाखवला, उत्तम संवाद ठेवला, त्यामुळे शरद पवार बिनविरोध निवडून गेले. ही महाराष्ट्राची संस्कृती असून मतभेद असले पाहिजे, पण मनभेद असू नये. राज्यसभेवेळी सगळ्या पक्षांनी समंजसपणा दाखवला, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. राज्यात अनेक निवडणुका बिनविरोध झालेल्या आहेत. काही ठिकाणी झालेल्या नाहीत. त्यामुळे काँग्रेसची भूमिका सोकशाही पद्धतीची असून त्यात मला काही गैर वाटत नाही, असेही त्या म्हणाल्या. काँग्रेसने बारामतीमध्ये उमेदवार दिल्यानंतर पार्थ पवारांनी प्रतिक्रिया दिली होती. काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू झाल्याचे ते म्हणाले होते. याबाबत विचारले असता सुप्रिया सुळे म्हणाल्या, आम्ही सगळ्यांनी काँग्रेस पक्ष फार जवळून पाहिलेला आहे. अनेकदा काँग्रेससोबत लढलो आणि निवडून आलो. अजितदादा, आम्ही सगळे काँग्रेस विचारांच्या तालमीत लहानाचे मोठे झालेलो आहोत. देशावर इंग्रजांचे राज्य होते, तेव्हा याच काँग्रेसमुळे देशाला मोकळा श्वास घेता आला. स्वातंत्र्य हे काँग्रेसचे देणे आहे हे कुणी नाकारू शकत नाही. काँग्रेसचे योगदान फार मोठे राहिले आहेत. पंतप्रधान ते सरपंच महिला आरक्षण, नरसिंह राव ते मनमोहन सिंग यांनी आणलेले आर्थिक धोरण या सगळ्याबाबत काँग्रेसचे योगदान नाकारून चालणार नाही. पण लोकशाहीत सगळ्यांना बोलण्याचा अधिकार असतो. त्यामुळे ते बोलत असतील, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. तसेच पार्थ पवारांच्या विधानाबाबत अजित पवार गटाला विचारले पाहिजे. ते अजित पवार गटाचे खासदार असून त्यांचे ते विधान आहे. त्यांच्याकडूनच संयुक्तिक उत्तर मिळू शकेल, असेही त्या म्हणाल्या.

# पदोन्नतीच्या नावाखाली ३ लाखांची लाच

## पुणे शिक्षण विभाग हादरला, एससीबी कडून तिघे लाच स्वीकारताना जेरबंद

**पुणे, ता. ७ :** पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील भ्रष्टाचाराचा मोठा भांडाफोड करत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धडक कारवाई करत सहाय्यक प्रशासन अधिकारीसह दोन कनिष्ठ सहाय्यकांना तब्बल २ लाख ७५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले. एसीबीने ही कारवाई हडपसरमधील बी.टी. कवडे रोड परिसरात सोमवारी (ता. ६) केली आहे. या कारवाईमुळे संपूर्ण शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात राजेश श्रीराम खंदारे (सहाय्यक प्रशासन अधिकारी), अनिल पोपट रंधवे व अतिश केरू शिंदे (कनिष्ठ सहाय्यक) यांना ताब्यात घेण्यात आले असून, वानवडी पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एका ३६ वर्षीय पुरुषाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे जिल्हा परिषदेत शिक्षण सेवक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना उपशिक्षक पदावर पदोन्नती मिळवून देण्यासाठी आरोपी अधिकाऱ्यांनी थेट ३ लाख रुपयांची लाच मागितली. धक्कादायक बाब म्हणजे, जात वैधता प्रमाणपत्र नसतानाही अधिसंख्य पदावर वर्ग करून सर्व सेवा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. यासाठीच पैशांची उघड मागणी करण्यात आली होती.

तपासादरम्यान आरोपींनी आधीच २५ हजार रुपये घेतल्याची कबुली दिली. त्यानंतर उर्वरित २ लाख ७५ हजार रुपयांसाठी तक्रारदारावर सातत्याने दबाव टाकण्यात येत होता. त्यानंतर तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतल्यानंतर ११ फेब्रुवारी रोजी पडताळणी करण्यात आली आणि लाच मागणी स्पष्ट झाली. त्यानंतर ६ एप्रिल रोजी हडपसरमधील बी.टी. कवडे रोड परिसरात सापळा रचण्यात आला. तेव्हा लोकसेवक अनिल रंधवे आणि अतिश शिंदे यांनी २.७५ लाख रुपये स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोघांना रंगेहात पकडले. त्यानंतर मुख्य सूत्रधार राजेश खंदारे यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त नीता मिसाळ करत आहेत.

# रेल्वेच्या विविध प्रश्नाबाबत आमदार राहुल कुल यांची रेल्वे व्यवस्थापक यांच्याशी चर्चा

## हडपसर-यवत उड्डाणपुलाच्या कामामुळे लोकल फेऱ्या वाढविण्याची विनंती

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ७ : दौंड, पुणे आणि बारामती पट्ट्यातील रेल्वे प्रवाशांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी आमदार राहुल कुल यांनी आक्रमक पाऊल उचलले आहे. पुणे ग्रामीण रेल्वे प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह त्यांनी पुणे विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा यांची भेट घेऊन प्रवाशांच्या मागण्यांचे निवेदन सादर केले. रेल्वे प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.

आमदार राहुल कुल यांनी यावेळी सांगितले की, दौंडला उपनगराचा दर्जा मिळावा यासाठी राज्य सरकार सकारात्मक आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र




फडणवीस यांनी यासंदर्भात रेल्वे मंत्र्यांना विशेष पत्र पाठवून दौंड मार्ग उपनगरीय म्हणून घोषित करण्याची शिफारस केली आहे. रेल्वे प्रशासनाने यावर तातडीने कार्यवाही करावी, जेणेकरून या भागातील विकासाला मोठी गती मिळेल. हडपसर ते यवत दरम्यान उड्डाणपुलाचे काम लवकरच सुरू होणार आहे. या कामामुळे रस्ते वाहतुकीवर प्रचंड ताण येऊन मोठी वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. ही कोंडी टाळण्यासाठी आणि प्रवाशांची गैरसोय रोखण्यासाठी पर्यायी मार्ग म्हणून पुणे-दौंड दरम्यान रेल्वे लोकलच्या फेऱ्या वाढवणे अत्यंत गरजेचे असल्याचे कुल यांनी निदर्शनास आणून दिले.

यावेळी पुणे ग्रामीण रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष फारुक बागवान, कार्याध्यक्ष प्रमोद उबाळे, सचिव अभिषेक सोनवणे, सदस्य ऋतिक भोसले, बालाजी पोवळे, धनंजय कुलकर्णी, मल्हारी बोधे, दत्ता शिंदे यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. रेल्वे प्रवास अधिक गतिमान आणि सुरक्षित करण्यासाठी आपला पाठपुरावा यापुढेही सुरू राहील, असे आश्वासन आमदार राहुल कुल यांनी यावेळी दिले.

**प्रमुख मागण्या**

- सध्या सुरू असलेल्या DMU लोकल वेळेवर चालवाव्यात, जेणेकरून नोकरी आणि व्यवसायासाठी जाणाऱ्या प्रवाशांचा वेळ वाचेल.
- प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता EMU लोकल दौंड ते पुणे आणि थेट लोणावळ्यापर्यंत चालवण्यात यावी.
- महिला आणि दिव्यांग बांधवांसाठी विशेष कोचची सेवा तात्काळ उपलब्ध करून ती अधिकृतपणे जाहीर करावी.
- सकाळी ८.२५ ते सायंकाळी ५ या वेळेत प्रवाशांच्या सोयीसाठी दौंड-पुणे दरम्यान नवीन लोकल सुरू करावी.

# लोणी काळभोर येथे कारने दिलेल्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू

**लोणी काळभोर, ता. ७ :** पुणेसोलापूर महामार्गावर भरधाव कारने दिलेल्या जोरदार धडक्त एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील माळी मळा परिसरात सोमवारी (ता. ६) सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात आजीचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ पसरली आहे.

कमल दत्तात्रय भुजबळ (वय अंदाजे ८२, रा. माळी मळा, लोणी काळभोर, ता. हवेली) असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचा नातू हर्षल संतोष भुजबळ (वय २०) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार कार




चालक प्रसन्न प्रकाश अहिरेकर (वय ३५, रा. सिंहगड रोड, पुणे) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कमल भुजबळ या पुणेसोलापूर रस्त्यावर माळी मळा परिसरात रस्ता ओलांडत होत्या. त्याचवेळी थेऊर फाट्याकडून पुण्याकडे येणाऱ्या टाटा टियागो या कारने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेची तीव्रता इतकी होती की त्या गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळल्या. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्परता दाखवत त्यांना तात्काळ शांताई हॉस्पिटल येथे दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी विश्वराज हॉस्पिटल येथे हलवण्यात आले. विश्वराज हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर उपचार सुरू करण्यापूर्वीच त्यांना मृत घोषित केले.

या घटनेमुळे भुजबळ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघातासाठी कार चालक प्रसन्न अहिरेकर याला जबाबदार धरत त्याच्याविरुद्ध बेफाम व निष्काळजी वाहन चालविल्याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ११९, १७७, १८४ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ चे कलम १०६ व २८१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अंकुश बोराटे करत आहेत.

# थेऊर फाट्यावर कंटेनरमधील लोखंडी रोल साखळी तुटून महामार्गावर कोसळला

**लोणी काळभोर, ता. ७ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील थेऊर फाटा येथे कंटेनरवर बांधलेला अवजड लोखंडी रोल साखळी तुटल्याने थेट महामार्गावर कोसळला. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी चालक मात्र थोडक्यात बचावला. या घटनेमुळे महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. सोमवारी (ता. ०६) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास एक कंटेनर लोखंडी रोल घेऊन पुण्याच्या दिशेने जात होता. थेऊर फाटा परिसरात आला असता, थेऊर बाजूकडे वळण घेत असताना अचानक कंटेनरवरील रोलला बांधलेली लोखंडी साखळी तुटली. क्षणात हा अवजड रोल चालकाच्या पाठीमागील बाजूला जाऊन आदळला. सुदैवाने हा रोल एखाद्या दुचाकी किंवा कारवर पडला असता, तर मोठी जीवितहानी झाली असती. यावेळी कंटेनर केबिनचे नुकसान झाले तर चालकाने तात्काळ गाडी थांबवून खाली उडी मारली. त्यामुळे हा लोखंडी पत्र्याचा रोल रस्त्यावर आदळला. ज्यावेळी हा रोल पडला, त्यावेळी आजूबाजूला इतर वाहने नसल्याने मोठा अनर्थ टळला. हा लोखंडी रोल वजनाने अत्यंत जास्त असल्याने तो रस्त्याच्या मधोमध पडून राहिला. यामुळे पुण्याहून सोलापूरकडे जाणाऱ्या वाहतुकीचा पूर्णतः बोजवारा उडाला. सायंकाळची वेळ असल्याने महामार्गावर वाहनांची वर्दळ जास्त होती, परिणामी काही वेळातच वाहनांच्या दोन ते तीन किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

दरम्यान, घटनेच्या वेळी वाहतूक पोलीस त्या ठिकाणी असल्याने पोलिसांनी व परिसरातील नागरिकांनी रस्त्यावर पडलेला अवजड रोल बाजूला सारण्यासाठी क्रेन पाचारण करण्यात आले असून वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलीसंकडून प्रयत्न सुरु आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## दररोज दही खा आणि मिळवा नैसर्गिक ग्लो; तरुण, सुंदर त्वचेसाठी सोपा उपाय!

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत, वाढते प्रदूषण आणि चुकीचा आहार यांचा सर्वाधिक परिणाम आपल्या त्वचेवर दिसून येतो. कमी वयातच त्वचा निस्तेज दिसू लागते, चेहऱ्यावर सुरकुत्या येतात आणि नैसर्गिक चमक कमी होते. अशा वेळी महागड्या स्किन केअर प्रॉडक्ट्सऐवजी नैसर्गिक उपाय शोधणाऱ्यांसाठी दही हा एक अत्यंत प्रभावी आणि सोपा पर्याय ठरू शकतो.

दही हे फक्त चविष्ट अन्न नसून ते पोषणमूल्यांनी भरलेले एक सुपरफुड आहे. आयुर्वेदानुसार, दही शरीराला आतून निरोगी ठेवते आणि त्याचा सकारात्मक परिणाम त्वचेवरही दिसून येतो. दररोज दही खाल्ल्याने त्वचा स्वच्छ, मऊ आणि तजेलदार दिसू लागते.

दहीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये असलेले लॅक्टिक ॲसिड. हे नैसर्गिक एक्सफोलिएटर म्हणून काम करते. त्यामुळे त्वचेवरील मृत पेशी (डेड स्किन सेल्स) दूर होतात आणि नवीन पेशी निर्माण होण्यास मदत होते. यामुळे चेहरा अधिक स्वच्छ, स्मूथ आणि चमकदार दिसतो.

तसेच, दही शरीरातील विषारी घटक (टॉक्सिन्स) बाहेर काढण्यास मदत करते. त्यामुळे त्वचा आतून शुद्ध होते आणि चेहऱ्यावर नैसर्गिक तेज येते. नियमित दही खाणाऱ्या लोकांची त्वचा अधिक फ्रेश आणि हेल्दी दिसते.

वय वाढत असताना त्वचेतील ओलावा कमी होतो, ज्यामुळे सुरकुत्या आणि पिग्मेंटेशन दिसू लागते. दहीमधील पोषक घटक त्वचेला हायड्रेटेड ठेवतात आणि ती मऊ बनवतात. त्यामुळे एजिंगची लक्षणे कमी दिसतात आणि त्वचा अधिक तरुण दिसते.

दहीमध्ये प्रोबायोटिक्स आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे त्वचेला स्वच्छ ठेवण्यास मदत करतात. यामुळे मुरुम (पिंपल्स) आणि ॲक्ने निर्माण करणाऱ्या जिवाणूंचा प्रभाव कमी होतो. त्यामुळे त्वचा अधिक निरोगी राहते.

तसेच, उन्हामुळे होणारी टॅनिंग, डार्क स्पॉट्स आणि पिग्मेंटेशन कमी करण्यासाठीही दही उपयुक्त ठरते. दही खाण्यासोबतच त्याचा फेस पॅक म्हणून वापर केल्यास त्वचेचा रंग एकसमान होतो आणि डाग कमी होतात.

उन्हाळ्यात सनबर्न आणि त्वचेची जळजळ ही सामान्य समस्या असते. अशा वेळी दहीचा थंडावा त्वचेला लगेच आराम देतो. चेहऱ्यावर दही लावल्यास जळजळ, सूज आणि ॲलर्जी कमी होण्यास मदत होते.

त्वचेच्या सौंदर्याचा थेट संबंध पचनाशी असतो. दहीमध्ये असलेले चांगले बॅक्टेरिया पचनक्रिया सुधारतात. त्यामुळे शरीरातील घाण बाहेर पडते आणि त्वचेवरील समस्या जसे की मुरुम, ॲक्ने आणि इन्फेक्शन कमी होतात.

एकंदरीत, दही हा स्वस्त, नैसर्गिक आणि परिणामकारक उपाय आहे, जो तुमच्या दैनंदिन आहारात सहज समाविष्ट करता येतो. त्यामुळे दररोज दही खाण्याची सवय लावल्यास त्वचा निरोगी, तजेलदार आणि तरुण राहण्यास मदत होते.

# बारामतीचा मतदार शांतपणे आपली भूमिका मतपेटीतून व्यक्त करेल

## लोकशाहीत निवडणूक लढण्यास विरोध कशाला? संजय राऊत

**बारामती, त. ७ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बारामती पोटनिवडणुकीबाबत भूमिका स्पष्ट केली असून काँग्रेसला उमेदवार देण्याचा अधिकार असल्याचे म्हटले. या मताशी आपण सहमत असल्याची प्रतिक्रिया शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत मंगळवारी माध्यमांशी बोलताना म्हटले. तसेच लोकशाहीत निवडणूक लढण्यास विरोध कशाला? असा सवाल करत बारामतीचा मतदार शांतपणे आपली भूमिका मतपेटीतून व्यक्त करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शरद पवार यांनी काँग्रेसच्या स्थापनेपासून त्या पक्षाबरोबर काम केले आहे. त्यांनी पक्ष सोडला तरी त्यांची विचारधारा काँग्रेसशी राहिली आणि पुढे राजकारणही त्यांनी काँग्रेसबरोबर केले. काँग्रेसला बारामतीची जागा लढण्याचा अधिकार आहे, कारण राष्ट्रवादी काँग्रेसने कौटुंबिक कारणामुळे ती जागा न लढवण्याचा निर्णय घेतला. याचा अर्थ दुसरे कुणी लढू नये ही भूमिका ठेवता येत नाही. लोकशाहीमुळे जर कुणी निवडणूक लढत असेल तर त्याला विरोधा कशा करता? लक्ष्मण जगताप यांच्या मृत्यूनंतर रिक्त झालेल्या जागेवर पार्थ पवार यांच्या वडिलांनीही निवडणूक लढली होती. काँग्रेसच्या मदतीने ते ही निवडणूक लढले होते हा अलिकडचा इतिहास आहे, असे राऊत म्हणाले.



सुनेत्रापवारयांच्याबद्दल,त्यांच्या कुटुंबाबद्दल, अजितदादांबद्दल आमच्या सद्भावना आहेत. त्या कारणाने शरद पवारांनी आपला उमेदवार दिला नाही. पण काँग्रेस हा महाविकास आघाडीतील स्वतंत्र पक्ष आहे. त्यांची भूमिका जर लढण्याची असेल तर त्यांनी उमेदवार दिलेला आहे. पण उमेदवार देताना त्यांनी एक अट टाकली आहे. जर अर्ज मागे घेण्याची तुमची विनंती आम्ही स्वीकारली तर अजित पवार यांच्या संशयास्पद अपघातासंदर्भातला एफआयआर महाराष्ट्रात दाखल करा, अशी अट काँग्रेसने टाकली आहे, असेही राऊत म्हणाले. तसेच बारामतीची निवडणूक ही कोणत्याही प्रचाराच्या रणधुमाळीशिवाय चालली आहे. बारामतीचा मतदार शांतपणे आपली भूमिका मतपेटीतून व्यक्त करेल, असेही ते म्हणाले.


दरम्यान, राहुरी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राजक्त तनपुरे यांनी ऐनवेळी माघार घेतली. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी त्यांची समजूत घातली का? असे विचारले असता संजय राऊत म्हणाले की, समजून कुणी सांगत नाही, तर धमक्या दिल्या जातात. समजून सांगायला कोण गेले होते तर विखे-पाटील आणि रवींद्र चव्हाण. ते काय क्रांतिकारी, स्वातंत्र्य सेनाने आहेत का? राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यावर किती आरोप आहेत. अलिकडे जमिनीचे प्रकरण समोर आले होते. चव्हाणांवरही कोकणात आणि सर्वत्र पैसे वाटल्याचे आरोप जाहीरपणे होत आहेत. हे समजून सांगायला जात नाही, तर धमक्या द्यायला जातात. माघार घ्या नाही तर फाईल काढू, नोटीस मारू. जे या धमक्यांना घाबरतात ते मागे जातात.

सध्या राजकारणात सहज काही मिळत नाही, तुम्हाला लढावे लागते, संघर्ष करावा लागतो. नाहीतर तुम्ही राजकारण करू नका. भाजपचे गुलाम म्हणून जगा. आम्हाला हे मान्य नाही. आम्ही भाजपला घाबरत नाही. भाजपच्या दहशतीला घाबरत नाही. कशा करता घाबरायचे? देशात लोकशाही आहे, ट्रम्पशाही नाही, असेही संजय राऊत म्हणाले.

# लोणी काळभोर येथील आईस्क्रिम पार्लरचे दुकान फोडून चोरट्यांनी १६ हजारांवर मारला डल्ला

**लोणी काळभोर, ता. ७ :** आईस्क्रिम पार्लरच्या दुकानाचे शटर उचकावून चोरट्यांनी गल्ल्यातील १६ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी स्टेशन (ता. हवेली) येथील एमआयटी परिसरात घडली असून मंगळवारी (ता.७) सकाळी उघडकीस आली आहे.

याप्रकरणी सत्यवान नवनाथ मुळे (वय ४२ व्यवसाय आईस्क्रिम पार्लर) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुळे यांचे एमआयटी कॉर्नर, खोले वस्ती येथील खोले यांच्या बिल्डिंगमध्ये आईस्क्रिम पार्लरचे दुकान असून ते कुटुंबासह तेथून उदरनिर्वाह करतात.



६ एप्रिल रोजी रात्री सुमारे १२ वाजता मुळे यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद करून घरी गेले. मात्र, एप्रिल रोजी पहाटे सुमारे अडीज वाजण्याच्या सुमारास शेजारी राहणाऱ्या शुभम जगताप यांनी फोन करून दुकान फोडल्याची माहिती दिली. तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असता दुकानाचे शटर अज्ञात चोरट्यांनी उचकावून आत प्रवेश केल्याचे दिसून आले.

दुकानात तपासणी केली असता गल्ल्यातील सुमारे १६ हजार रुपयांची रोकड चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. या रकमेमध्ये १०, २०, ५०, १००, २०० आणि ५०० रुपयांच्या नोटांचा समावेश होता. याच परिसरातील शेजारील काका हलवाई दुकानाचेही शटर उचकावण्यात आले होते. मात्र, त्या दुकानातून कोणतीही रोकड किंवा साहित्य चोरीस गेले नसल्याची माहिती मिळाली आहे.

या सलग घटनांमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीती आणि संताप व्यक्त होत आहे. घटनास्थळी पोलिसांनी पाहणी केली असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू करण्यात आला आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४), ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कौटुंबिक वादातून जावयावर जीवघेणा हल्ला

**सासवड, ता. ७ :** लग्नाला जाताना पत्नीने न विचारल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून सासरच्या मंडळीकडून जावयाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. भिवरी (ता. पुरंदर) ग्रामपंचायत हद्दीत २० मार्चला रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध सोमवारी (ता. ०६ एप्रिल) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुभम बाळु खेनट, सिंधुबाई बाळु खेनट (रा. जगतापवस्ती नीरा, ता. पुरंदर), व सोनाली म्हस्कु कटके (रा. भिवरी, ता. पुरंदर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. तर म्हस्कू पांडुरंग कटके (वय ४१, रा. भिवरी) असे मारहाण झालेल्या जावयाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तिघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० मार्च २०२६ रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी म्हस्कू कटके यांनी आपली पत्नी सोनाली हिला मला न विचारता लग्नाला का गेली? असा जाब विचारला. याचा राग धरून पत्नीने तिचे माहेरचे लोक म्हणजे भाऊ आणि आईला बोलावून घेतले.

पत्नीने बोलावल्यानंतर मेव्हणा शुभम बाळू खेनट आणि सासू सिंधुबाई बाळू खेनट हे म्हस्कूयांच्या घरी आले. तू माझ्या बहिणीला का त्रास देतोस? तुझे हातपायच तोडतो, अशी धमकी देत शुभमने शिवीगाळ सुरू केली. यावेळी पत्नी सोनाली आणि सासू सिंधुबाई यांनी म्हस्कू यांचे दोन्ही हात पाठीमागून घट्ट धरून ठेवले, जेणेकरून त्यांना प्रतिकार करता येऊ नये.

# विमाननगरमध्ये हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेचा छापा; सुमारे दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे, ता. ७ :** पुण्यातील विमाननगर परिसरातील नामांकित ॲटलान्टिस रूफ टॉप लाऊंज हॉटेलमध्ये बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने धडक कारवाई करत मोठा भांडाफोड केला आहे. या कारवाईत तब्बल १ लाख ४७ हजार ५५० रुपयांचा हुक्का साहित्य, विदेशी दारू व रोख रक्कम जप्त करण्यात आली असून, सात जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या कॉम्बिंग ऑपरेशन दरम्यान अंमली पदार्थ विरोधी पथकला गुप्त माहिती मिळाली होती की, विमाननगरमधील या हॉटेलमध्ये विनापरवाना हुक्का पार्लर चालवला जात आहे. यानुसार पोलिसांनी सापळा रचत हॉटेलवर अचानक छापा टाकला. या छाप्यात स्वप्निल तांबे, अमेय अजमीरे, नवरंग कोल्हे, अमितकुमार गोयल, कमसल लष्कर, शिवम यादव आणि माहरुफ आलम हे आरोपी बेकायदेशीररीत्या हुक्का बार चालवत असल्याचे उघड झाले. तसेच परवानगीशिवाय विदेशी दारूचा साठा ठेवून विक्री केली जात असल्याचाही धक्कादायक प्रकार समोर आला. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळावरून हुक्का पॉट, फ्लेवर्ड तंबाखू साहित्य, विदेशी दारूच्या बाटल्या आणि रोख रक्कम असा मोठा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात सिगारेट व तंबाखूजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# भवरापूर परिसरात गोठ्यात शिरून बिबट्याकडून वासराची शिकार

## तीन महिन्यांपूर्वी तीन शेळ्यांचाही पाडला होता फडशा

**उरुळी कांचन, ता. ७ :** भवरापूर (ता. हवेली) परिसरात दिवसेंदिवस बिबट्याचा वावर वाढू लागला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशातच सोमवारी (ता. ०६) एका शेतकऱ्याच्या एका वर्षाच्या गायीच्या वासरावर बिबट्याने हल्ला केला. यामुळे बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे. परंतु, वन विभागाकडून बिबट्याला पकडण्यासाठी कोणतीच कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त होत आहे.



भवरापूर येथील शेतकरी दिगंबर यशवंत जगताप (रा. भाग्य उदय सोसायटी, भवरापूर) यांच्या गोठ्यात सोमवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास बिबट्याने शिरकाव केला. यावेळी गोठ्यात बांधलेल्या एका वर्षाच्या वासराचा बिबट्याने गळा घोटून शिकार केली. पहाटेच्या सुमारास जनावरांच्या ओरडण्याच्या आवाजाने घरचे जागे झाले, मात्र तोपर्यंत बिबट्याने वासराचा जीव घेतला होता.

विशेष म्हणजे, याच गोठ्यातून तीन महिन्यांपूर्वी बिबट्याने तीन शेळ्यांची शिकार केली होती. त्यावेळी वनविभागाचे अधिकारी गायकवाड यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला होता.

त्यावेळी जगताप कुटुंबियांनी आणि ग्रामस्थांनी परिसरात पिंजरा बसवण्याची आग्रही मागणी केली होती. मात्र, वनविभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आता ग्रामस्थ करत आहेत.



# एकनाथ शिंदेंना चौकशीला कधी बोलावणार? अंधारेंचा सरकारला सवाल

**मुंबई, ता. ७ :** नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरातचा सीडीआर हा एसआयटी काढत नाही, तर कुणीतरी बाहेरचा व्यक्ती काढते, ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे सीडीआर बाहेर काढलेल्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्यावर कारवाई करावी, मात्र, त्यामध्ये नाव असलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना एसआयटी चौकशीला कधी बोलवणार?, असा प्रश्न ठाकरेसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे.

तसेच, दीपक केसरकर हे या प्रकरणातील सर्व कड्या जोडणारे व्यक्ती आहेत, त्यांनाही चौकशीला कधी बोलावले जाणार याचीही माहिती द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

सुषमा अंधारे म्हणाल्या, ज्यांनी सीडीआर बाहेर काढले त्यांच्यावर कारवाई करावी, पण ज्यांचे सीडीआरमध्ये नाव निघाले त्यांच्यावर काय कारवाई करणार? या प्रकरणात एकनाथ शिंदे यांचे नाव आहे. सातारा ड्रग्जच्या प्रकरणात आम्ही अनेक आरोप केले, पण त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राज्याच्या महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा यांनी इतक्या वेळा अशोक खरातला कॉल का केला? याची माहिती समोर आली पाहिजे. एसआयटी चांगले काम करेल अशी अपेक्षा आहे, पण नाईलाजाने त्यांच्या तपासाच्या गतीवर टीका करावी लागत आहे.

एखादी माहिती अंजली दमानिया आणि माझ्यापर्यंत पोहोचते, पण तीच माहिती एसआयटीपर्यंत का पोहोचत नाही? या काळात पुरावे नष्ट केले जाऊ शकतात. एकनाथ शिंदे आणि दीपक केसरकर ही नावे मोठी आहेत, त्यामुळे त्यांची चौकशी का केली जात नाही? असा प्रश्नही अंधारे यांनी विचारला.

अशोक खरातचा निकटवर्तीय नामकर्ण आवारे, खरातचा सीए ललित पोकळे, नाशिकच्या काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा यामध्ये हात असून, त्याची माहिती आम्ही एसआयटीला दिली आहे. परंतु त्यावर अद्याप काहीही कारवाई केली जात नाही, असे अनेक प्रश्न सुषमा अंधारे यांनी केले आहेत.

# बँक कर्मचारी महिलेला शिवीगाळ करुन विनयभंग

**पुणे, ता. ७ :** बँक कर्मचारी महिलेला शिवीगाळ करुन तिचा विनयभंग केल्याची घटना कोरेगाव पार्क भागातील एका बँकेत घडली. या प्रकरणी पोलिसांनी एका विरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बँक कर्मचारी महिलेने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कोरेगाव पार्क भागातील एका बँकेत कर्माचारी आहे. आरोपी शेख हा बँकेत सोमवारी (ता. ०६) दुपारी पावणेएकच्या सुमारास व्यावसायिक कर्ज मिळवण्याबाबतची कागदपत्रे घेऊन बँक्त आला होता. बँकेचे लेखापरीक्षण सुरू असल्याने बँक कर्मचारी महिलेने शेख याला थांबण्यास सांगितले. या कारणावरुन शेखने महिलेला शिवीगाळ करुन तिचा विनयभंग केला, तसेच महिलेला धमकावले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

# आखाती युद्धाच्या झळा भोर तालुक्यातील पोल्ट्री व्यवसायाला

## निर्यात घटल्याने अंड्यांचे दर कोसळले ; उत्पादक दुहेरी संकटात

**विशाल शिंदे**

**नसरापूर, ता. ७ :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता थेट पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात उमटू लागले असून, पोल्ट्री व्यवसायाला मोठा फटका बसत आहे. अंड्यांची निर्यात घटल्याने बाजारात अंड्यांचा साठा वाढला असून, त्यामुळे दरात लक्षणीय घसरण झाली आहे. परिणामी ग्रामीण भागातील अंडा उत्पादक व्यावसायिक अडचणीत सापडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय स्तरावर युद्धामुळे व्यापार आणि वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. याचा थेट परिणाम अंड्यांच्या निर्यातीवर झाला असून, मोठ्या प्रमाणात निर्यात घटली आहे. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत अंड्यांचा पुरवठा वाढल्याने दर कोसळले आहेत. सध्या एका अंड्यामागे सरासरी दीड रुपयांपर्यंत दर घसरल्याचे चित्र आहे.



दर घसरत असताना उत्पादन खर्च मात्र वाढत असल्याने पोल्ट्री व्यावसायिकांना मोठ्या आर्थिक ताणाला सामोरे जावे लागत आहे. युद्धामुळे कोंबड्यांचे खाद्य (फीड) तसेच औषधांच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे खर्च वाढ आणि उत्पन्न घट अशा दुहेरी संकटात अंडा उत्पादक अडकले आहेत.

भोर तालुक्यातील पोल्ट्री व्यावसायिक अनिल थोपटे यांनी सांगितले की, सध्याची परिस्थिती अत्यंत गंभीर असून, अंड्यांचे दर सतत घसरत आहेत. उत्पादन खर्च भागवणेही कठीण झाले आहे. ही परिस्थिती लवकर सुधारली नाही, तर अनेकांना पोल्ट्री व्यवसाय बंद करण्याची वेळ येऊ शकते.

ग्रामीण भागात पोल्ट्री हा महत्त्वाचा पूरक व्यवसाय मानला जातो. मात्र सध्याच्या घडीला या व्यवसायावर संकटाचे सावट असून, शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी व्यावसायिकांकडून केली जात आहे.

दरम्यान, भोर येथील एका पोल्ट्री फार्मला भेट देऊन या परिस्थितीचा आढावा घेतला असता, उत्पादन आणि विक्री यामधील तफावत स्पष्टपणे जाणवत असल्याचे दिसून आले. त्यामुळे आगामी काळात पोल्ट्री व्यवसायाचे भवितव्य काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.